# तालुका बीज गुणन प्रक्षेत्र योजनेतर योजना (२४०१ ०२६१)

## १०० टक्के राज्य पुरस्कृत योजना

### सन २०१५-१६ मध्ये राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना

**प्रस्तावना:-** तालुका बीज गुणन प्रक्षेत्रावर बिजोत्पादन कार्यक्रम घेऊन नव नवीन वाणांचे बियाणे उत्पादीत करण्यात येते. तालुका बीज गुणन प्रक्षेत्र योजनेतर योजना या योजनेअंतर्गत प्रक्षेत्रावर वेतन, मजुरी, अतिकालीक भत्ता, दुरध्वनी, वीज आणि पाणी शुल्क, प्रवास खर्च, कार्यालयीन खर्च , भाडे कर तसेच गौण बांधकामे सामुग्री व पुरवठा या घटकांसाठी अनुदान उपलब्ध करुन दिले जाते.

**उद्देश :-** या योजनेअंतर्गत प्रक्षेत्रावर गौण बांधकामे, सामुग्री व पुरवठा आणि कार्यालयीन खर्च या बाबी साठी अनुदान असून बीजोत्पादन करणे व विविध पिकांचे उत्पादन घेणे तसेच शेती संलग्न पुरक कार्यक्रम जसे गांडूळ कल्चर, गांडूळ खत उत्पादन, जैविक नियंत्रणाचे घटक उत्पादीत करणे, नाडेप पध्दतीने कंपोष्ट खत तयार करणे, निम पावडर, निम आर्क उत्पादन करणे असे विविध उपक्रम घेऊन तालुका बीज गुणन प्रक्षेत्र अधिक कार्यक्षम करणे.

**आर्थिक तरतुद:-** अनुदानाचे वाटप आयुक्तालयाचे लेखा शाखेकडून बी.डी.एस. प्रणालीव्दारे विभागास वितरीत करण्यात येते. बाबवार निर्धारीत केलेल्या कार्यक्रमासाठी सक्षम अधिकाऱ्याची प्रशासकीय मान्यता व तांत्रीक मान्यतेनूसार मंजूरी आदेश निर्गमित झाल्यानंतरच बाबीवरील खर्च करण्यात यावा.

**१)** वेतन, मजुरी, अतिकालीक भत्ता, दुरध्वनी, वीज आणि पाणी शुल्क, देशांतर्गत प्रवास खर्च, कार्यालयीन खर्च , भाडे कर या घटकांसाठी विहीत लेखा पध्दतीचा अवलंब करुन उपलब्ध अनुदानातून खर्च करण्यात यावा.

**२) सामुग्री व पुरवठा :-** तालुका बीज गुणन प्रक्षेत्रावर घेण्यात येणा-या कार्यक्रमातील निविष्ठा जसे बियाणे, खते, पीक संरक्षीत औषधे, कृषि औजारे, विद्युत पंपसेट इ. खरेदी करणे, विद्युत पंपाची देयके देणे, प्रक्षेत्रावरील ट्रॅक्टरचे इंधन व दुरुस्ती, त्याचप्रमाणे प्रक्षेत्रावर राबविण्यात येणारे पूरक कार्यक्रम जसे जैविक किड नियंत्रक उत्पादके, गांडूळ कल्चर/खत उत्पादन, निम पावडर/ निमअर्क, युरीया ब्रिकेट्स तयार करणे इत्यादी उपक्रमांसाठी अनुदान देय राहील.

**३) गौण बांधकामे :-** गौण बांधकामे याबाबीखाली प्रक्षेत्रावरील उत्पादनात वाढ करण्यास सहाय्यभूत ठरणारी सिंचनाची कामे सूक्ष्म सिंचन, उपसा सिंचन, पाईप लाईन बसविणे, विहीर खोल करणे, नवीन विहीर खोदणे, कूप नलिका घेणे, गोडावून बांधकामे व प्रशिक्षण हॉलचे किरकोळ बांधकामे, संरक्षण भिंत बांधणे, अंतर्गत रस्ते इत्यादी बांधकामे व दुरुस्ती प्राधान्याने घेण्यात यावीत. पीक उत्पादन वाढविण्यासाठी आवश्यक ती गौण बांधकामे घेण्यात यावीत.

अनावश्यक खर्च होणार नाही याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

मा.संचालक (नि. व गुनि.) यांचे मान्यतेने

कृषि संचालक (नि.व गुनि)
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे करीता

-------------------00000000---------------

जा.क्र/गुनि१/२/ताबिप्र/प्र.क्र.१/मासु१५-१६/१०८/२०१५
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
दिनांक :२३/०४/२०१५

प्रति,

**विभागीय कृषि सहसंचालक --------------------- (सर्व)**
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी -----------------(सर्व)**

F:\backup\TSF\TSF 15-16\Guidelines 15-16TSF 0261 .lwp